# श्री. सईद अब्दुल अजीज पिरजादे,

## विरुध्द

## संगमेश्वर शिक्षण संस्था व इतर

**<u>निशानी क्र. ५५ खालील आदेश</u>**

(दिनांक २० ऑगस्ट २०२४)

प्रस्तुतचा अर्ज हा जाब देणार क्रमांक २ यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेतील आदेश ६ व नियम १७ कलम १५१ अन्वये बचावपक्षाच्या लेखी म्हणण्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. अपिलकार यांनी निशानी ५६ वर त्यांचे म्हणणे मांडून अर्जास विरोध दर्शविला.

२. जाब देणार क्रमांक २ यांच्या कथनाप्रमाणे अपिलकार यांनी प्रस्तुतचे अपिल हे शिक्षक या नात्याने सादर केले आहे परंतू प्रकरण प्रलंबित असताना बार कौ न्सल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा यांच्याकडून वकिली सनद घेवून अपिलकार यांनी वकिली व्यवसाय सुरु केला आहे, सबब त्यास प्रस्तूतचे प्रकरण चालविण्याचे हक्क उरत नाही म्हणून लेखी कैफीयतीमध्ये प्रस्तुतची परिस्थिती समाविष्ठ करण्याकरीता व लेखी कैफीयतीमध्ये दुरुस्ती करुन वाढीव कैफीयत परिच्छेद क्रमांक ३२ मध्ये दाखल करण्याकरीता हा अर्ज दाखल केला आहे.

३. अपिलकार यांच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतचे अपिल हे महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ च्या कलम ९ व नियमावली १९८१ अन्वये दाखले केले असून अपिलकार हे कर्मचारी या संज्ञेमध्ये मोडतात. जरी अपिलकार यांनी वकिली सनद घेतली असली तरी तो उत्पन्नाचा मार्ग होत नाही म्हणून प्रस्तुतची दुरस्ती प्रकरणाच्या मुळाशी जाणारी ठरणार नाही, सबब दुरुस्तीची परवानगी देणे न्यायोचित ठरत नाही. अपिलकार यांच्या कथनाप्रमाणे बचाव लेखी कैफीयत ही जाब देणार क्रमांक १ ते ४ यांनी एकत्रितरित्या दाखल केली असून, जाब देणार

क्रमांक २ यांनी स्वतंत्ररित्या प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याने त्यास कायदयाची बाधा उत्पन्न होते.

४. उभय विद्यमान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या लेखी कैफीयतीप्रमाणे युक्तीवाद सादर केला. जाब देणार यांचे विद्यमान विधिज्ञ श्री. पाटील यांनी प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये अपिलदार हे आता वकिली व्यवसाय करत असलेने अपिल चालविण्यास काही एक कारण अस्तित्वात राहत नाही ही बाब कैफीयत दुरुस्त करुन न्याय पटलावर आणणे गरजेचे असल्याचा युक्तीवाद मांडला. याउलट अपिलकार यांच्या युक्तीवादाप्रमाणे जाब देणार क्रमांक २ यांना संयुक्तरित्या अर्ज दाखल करणे गरजेचे असताना त्यांनी स्वतंत्ररित्या प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब प्रस्तुतच्या अर्जाला बाधा येत असल्याचा युक्तीवाद मांडून त्यापृष्ठर्थ *श्रीमती चंदा केदीया व इतर विरुध्द द्वारीका प्रसार केदीया व इतर, २०२४ AHC ६५९६४* हा न्यायनिवाडा सादर केला.

५. सदर न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, ज्यावेळी एकत्रितरित्या लेखी म्हणणे सादर केले आहे त्यावेळी त्यातील जाब देणार स्वतंत्ररित्या कैफीयत दुरुस्तीचा अर्ज सादर करु शकत नाही . माननीय न्यायालयाने मांडून दिलेल्या या मताशी मी सहमत असून प्रस्तुत प्रकरणात देखील जाब देणार क्रमांक १ ते ४ यांनी संयुक्तिकरित्या निशानी १७ वर त्यांचे लेखी म्हणणे मांडले असले तरी प्रस्तुतचा अर्ज हा जाब देणार क्रमांक २ यांनी दाखल केला आहे. सदर अर्जाला पुष्ठी देण्याकरीता जाब देणार यांनी जाब देणार क्रमांक १, ३ व ४ यांचे शपथपत्र निशानी क्र. ५९ अन्वये सादर केले आहे, सबब प्रस्तुतच्या प्रकरणात जाब देणार क्र १ ते ४ यांचे शपथपत्र असल्याचे दिसून येते, सबब प्रस्तुत अर्जास संयुक्तिकरित्या लेखी म्हणणे असताना स्वतंत्रपणे जाबदार क्रमांक २ यांनी अर्ज दिल्याची बाधा अस्तित्वात राहत नाही.

६. अपिलदार यांच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतची दुरुस्ती मागून जाब देणार हे मान्य केलेल्या बाबी नाकारु शकत नाहीत. सबब अपिलकार यांनी *महेंद्रप्रताप सिंग विरुध्द रामा रमन व इतर, २०२४ AHC ९५७९०* या प्रकरणाचा न्यायनिवाडा सादर केला आहे.

मा. उच्च न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणामध्ये असे मत प्रदर्शित केले आहे की, मान्य केलेल्या बाबी दुरुस्तीच्या स्वरुपातून वगळता येणार नाहीत अथवा खोडता येणार नाहीत. सदर न्यायनिवाडयाच्या अनुषंगाने विद्यमान विधिज्ञ श्री. गायकवाड यांनी वाद कैफीयत निशानी १७ मधील परिच्छेद क्र २३ मध्ये जाब देणार यांनी अपिलकार हे त्यांचेकडे सहाय्यक शिक्षक म्हणून सेवेत होते असे नमूद केल्याचे निदर्शित करुन प्रस्तूत अर्जामध्ये मागीतलेल्या दुरुस्तीप्रमाणे अपिलकार शिक्षक या संज्ञेत बसत नसल्याची दुरुस्ती मागून मान्य केलेल्या बाबी जाब देणार वगळत असल्याचे कथन केले. विद्यमान विधिज्ञ श्री. गायकवाड यांनी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे मी निशानी १७ वरील वाद कैफीयत व प्रस्तुतच्या अर्जाचे अवलोकन केले. परिच्छेद क्र. ३२ मध्ये नवीन प्रस्तावित दुरुस्ती पाहता ती चालू घडामोडी बाबत असल्याचे दिसून येते, यावरुन निशानी १७ मधील परिच्छेद क्रमांक २३ ला देण्यात आलेल्या मान्यता नाकारल्याचे दिसून येत नाही, सबब प्रस्तुतची दुरुस्ती करुन प्रतिवादी मान्य केलेल्या बाबी खोडत असल्याचे यामितीस निदर्शनास येत नाही.

७. अपिलकार यांनी ***गुरुमहाराज शिक्षण प्रसारक मंडळ व इतर विरुध्द जालिंधर व इतर (२००५)११BOM CK 0017*** हा न्यायनिवाडा सादर केला आहे. प्रस्तुतचा न्यायनिवाडा पाहता अपिलातील पक्षकारांना कधी जादाचा पुरावा देण्याची संधी देण्यात यावी याबाबतचा उहापोह केल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज हा कैफीयत दुरुस्तीबाबत असल्याने सदरचा न्यायनिवाडा येथे लागू होत नाही.

८. उभयंतांना मान्य असल्याप्रमाणे अपिलकार यांनी प्रस्तुतचे अपिल दाखल केल्यानंतर वकिली सनद प्राप्त केली आहे. अपिल दाखल केल्यानंतरच्या घडामोडी या महत्त्वपूर्ण घडामोडी ठरतात. अपिलकार आजमितीस कुठल्या मार्गाने उत्पन्न मिळवित आहेत हा मुद्या काहीअंशी अपिलात मागण्यात आलेल्या अनुतोषाच्या मुळास जातो, सबब जाब देणार यांनी मागीतलेली कैफीयतीची दुरुस्ती ही अपिलाचे अथवा बचाव लेखी कैफीयतीचे स्वरुप बदलत नसल्याचे दिसून येते तसेच चालू घडामोडी न्यायपटलावर येणे गरजेचे असल्याच्या मतास मी प्राप्त झाले आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करुन दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ व नियम १७ अन्वये निशानी क्रमांक १७ वरील बचाव लेखी कैफीयतीमध्ये परिच्छेद क्रमांक ३२ दाखल करुन बचाव लेखी कैफीयत दुरुस्त करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२. जाब देणार यांनी आदेशापासून ७ दिवसाचे आत लेखी कैफीयत दुरुस्त करुन दुरुस्त कैफीयतीची प्रत न्यायपटलावर सादर करावी.

३ बचाव कैफीयतीमध्ये दुरुस्ती झाल्याने अपिलकार यांना त्यानुषंगाने रिजॉइंडर दाखल करण्यास मुभा देण्यात येत आहे.

४. प्रकरणाचे वय पाहता प्रस्तुत प्रकरण हे ५ वर्षांपेक्षा जुने असल्याने उभयंतांना प्रस्तुतचे प्रकरण हे तात्काळ चालविण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

Digitally signed by VAISHALI NIVRUTI DHAVLE
Date: 2024.08.30 13:21:12 +0530

तारीख – २०/०८/२०२४
ठिकाण - कोल्हापूर

(वै. नि. ढवळे)
पीठासीन अधिकारी,
शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर.